# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ / आश्विन १८, १९४४ (शके)**

## १२९. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संस्थगित झाले. संस्थगित झालेल्या सन २०२१ च्या तृतीय अधिवेशनातील एकूण ३७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. उक्त जोडपत्रामधील १० लक्षवेधी सूचनांची निवेदने विभागाकडून प्राप्त झाली असून त्याचदिवशी मा.सदस्यांकरीता राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरीत करण्यात आली होती. उर्वरित २७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १५ निवेदने दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक २ अन्वये सन्मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. तसेच प्रलंबित १२ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६ निवेदने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२ अन्वये वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ६ प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **राजेन्द्र भागवत** |
| **मुंबई,** | **प्रधान सचिव** |
| **दिनांक : १० ऑक्टोबर, २०२२** | **महाराष्ट्र विधानसभा.** |

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. अबू आजमी, श्री. सुधीर मुनगंटीवार, ॲड. राहुल नार्वेकर,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :**

"राज्यामध्ये "बिंगो रोलेट" नामक ऑनलाईन गेममध्ये लाखो रुपये गमाविलेल्या सुमारे ६० व्यक्तींनी राज्यभरात आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती पोलिस सुत्रांनी दिली असणे, लॉकडाऊनच्या काळात सदर गेम ने देशभरात तरुणांना विळखा घातला असणे, सदर ऑनलाईन गेम अवैध असल्याचे राज्य शासनाला मान्य असणे, तरीही आर्थिक अमिषामुळे तरुणांचे बळी जात असणे, "गेमकिंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" आणि "फनगेम"चे सर्वेसर्वा रमेश लखुलाल चौरसिया आणि आंचल रमेश चौरसिया हे पिता-पुत्र या ऑनलाइन गेम मागचे मुख्य सुत्रधार असणे, सदर गेममध्ये फसलेल्या कर्जबाजारी तरुणांनी आत्महत्या केल्या असणे, एकुण ६० पेक्षा अधिक आत्महत्या झाल्याची तक्रार मुख्यमंत्री आणि महासंचालकांकडे करण्यात आलेली असणे, अद्यापही कुठल्याच प्रकारची कारवाई झालेली नसणे, सदर ऑनलाइन गेमच्या गुन्हयांची व्याप्ती, उलाढाल मोठी असणे परंतु कायदा मात्र परंपरागत जुगारासंबंधीच्या गुन्हयांसाठी असणे, सदर कायद्यात शिक्षा आणि दंड वाढविण्यासंबंधी पोलीस आयुक्तांनी महासंचालकांना पत्र लिहीले असणे, रमेश चौरसिया आणि आचल चौरसिया विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदयां अंतर्गत कार्यवाहीसाठीच्या तसेच आचल चौरसिया विरुध्द "लूक आऊट" नोटीस जारी करण्याचा प्रस्ताव आयपीएस अधिकारी यांनी पाठविला असणे, सदर प्रस्ताव फेटाळण्यांत आल्याची धक्कादायक माहिती पुढे आली असणे, नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षक यांनी चौरसिया पिता पुत्रासह इतर सहा आरोपी विरुध्द मकोका कारवाईसाठीचा प्रस्ताव नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी नाकारणे, याबाबत सखोल चौकशी करुन सर्व दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

## मा. गृहमंत्री महोदयांचे निवेदन

राज्यात बिंगो रोलेट नामक ऑनलाईन गेमच्या अनुषंगाने मुख्यत: पोलीस आयुक्तालय नाशिक, नाशिक जिल्हा पोलीस कार्यक्षेत्र व पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई या ठिकाणीच गुन्हे दाखल असून ऑनलाईन गेममध्ये पैसे गमावल्याने नाशिक जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात दोन व्यक्तींनी आत्महत्या केली आहे.

गेमकिंग इंडिया प्रा.लि. आणि फेम गेम चे सर्वेसर्वा रमेश लखुलाल चौरसिया आणि आंचल रमेश चौरसिया हे पिता पुत्र यांच्या विरोधात पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई येथे सन २०१३ ते दिनांक २१.१२.२०२१ रोजी पर्यंत एकूण १७ गुन्हे दाखल आहेत. तसेच, पोलीस आयुक्तालय, नाशिक येथे २१ गुन्हे व नाशिक जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात ०२ असे

पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडून ऑनलाईन गेमच्या गुन्ह्यांबाबत शिक्षा व दंडासंबंधीत तरतुदीत वाढ करण्याबाबत दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे अहवाल सादर केला आहे व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर सुरु आहे.

रमेश चौरसिया व आंचल चौरसिया व इतर ०४ अशा एकूण ०६ आरोपींविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम, १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) हे वाढीव कलम लावण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, नाशिक यांच्याकडून विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्याकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आला होता. परंतु सदरचे गुन्ह्यात मोक्का कायदा लावण्याबाबत आवश्यक तरतुदी पूर्ण होत नसल्याने मोक्का कायद्यांतर्गत कलम लावण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

रमेश चौरसिया व आंचल चौरसिया यांच्या विरुध्द दाखल असलेल्या त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन मध्ये गु.र.क्र. ११/२०२१, भा.दं.वि.कलम ३०६, ३४ या गुन्ह्यात या दोन्ही आरोपींविरुध्द दिनांक ०३.०२.२०२१ अन्वये लूक आऊट नोटीस काढण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र. ९

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२१ चे हिवाळी अधिवेशन**

**श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, वि. स. स.,**

"पॉर्नोग्राफिक व्हिडीऔचे चित्रीकरण करून ते वेबसाईटवर अपलोड करण्याचे रॅकेट मुंबईत उघडकीस आले असणे, सदर प्रकरणात आतापर्यंत अभिनेत्री गहना वशिष्ठसह ९ जणांना अटक झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती बरीच मोठी असणे, चित्रपट, मालिका तसेच वेब सीरीजमध्ये संधी मिळवून देण्याच्या नावाखाली तरूण-तरूणींचे अश्लील व्हिडिओ पार्न साईटवर अपलोड करीत लाखोंची कमाई करणा-या रॅकेटचा मुंबई पोलिसांच्या मालमत्ता कक्षाने पर्दाफाश केला असणे, गहनाचे स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस असणे, गहना वेब सीरीज, शार्ट फिल्मच्या नावाखाली पॉर्नोग्राफिक व्हिडिओ तयार करून ते वेबसाईटवर अपलोड करायची असा तिच्यावर आरोप असणे, सदर आरोपाखाली पोलिसांनी गहनाला अटक केली असणे, अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे पती राज कुंद्रा यांच्या विआन इंडस्ट्रीजमध्ये व्यवस्थापकीय संचालक असलेला उमेश कामत याला ही अटक करण्यात आली असणे, मालवणी पोलिस ठाण्यात झारखंडच्या १९ वर्षीय तरूणीने तक्रार दाखल केली असून रोवा खान ऊर्फ यास्मीन खान विरुध्द स्वतंत्र गुन्हा नोंद करण्यात आला असणे, यामध्ये प्रोड्युसर, डायरेक्टर, मॉडेल रीवा खान ऊर्फ यास्मीनचा पती शान बॅनर्जी ऊर्फ दीपंकर खसनवीस यालाही अटक करण्यात आली असणे, पॉर्नव्हिडिओ तयार करण्याच्या कारवाया खुलेआम होत असतांना त्यासोबत अन्य गंभीर गुन्हेही त्यासोबत असणे, बॉलिवूडमध्ये नशीब आजमावण्यासाठी आलेल्या तरूण-तरुणींना हेरून वेबसिरीज, चित्रपट, मालिकामध्ये काम देण्याच्या बहाण्याने तथाकथित प्रॉडक्शन हाऊस त्यांचे शोषण करीत असणे, गेल्या पाच महिन्यात लॉकडाऊनच्या कालावधीत भारतात चाइल्ड पॉर्नोग्राफीशी संबंधित २५ हजार मटेरियल अपलोड करण्यात आले असणे, त्यात प्रथम दिल्ली नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागत असणे, सदर अश्लीलतेचा हा मोठा उद्योग बिन बोभाट सुरू असणे, यावर प्रभावीपणे पायबंद घालण्यासाठी प्रयत्न आणि नियोजन करणे तसेच कलेच्या नावाखाली चाललेला हा काळा धंदा नेस्तनाबूत करण्यासाठी सायबर ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची तीव्र गरज निर्माण झाली असणे, तसेच पॉर्नोग्राफी फिल्म बनवणा-या प्रॉडक्शन हाऊस व संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई तसेच उपाययोजना व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

## मंत्री (गृह) यांचे निवेदन

'मढ गांव, मालाड-मालवणी (पश्चिम), मुंबई येथील भाड्याने घेतलेल्या बंगल्यामध्ये काही लोक तरूण स्त्री-पुरुष कलाकारांचे अर्धनग्न, विवस्त्र व अश्लिल बिभत्स चित्रीकरण करणार आहेत आणि सदर चित्रीकरण विविध वेबसाईटवर, ॲप्लीकेशनवर प्रसारित करणार आहेत,' या गुप्त माहितीच्या आधारे मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने दिनांक ०४.०२.२०२१ रोजी त्या ठिकाणी छापा घातला.

त्यावेळेस अश्लिल फिल्मचे चित्रिकरण करताना एकुण ५ आरोपी आढळून आले. पोलीसांनी सदरील ५ आरोपींना अटक केली आणि १ पिडीतेची सुटका केली. याप्रकरणी मालमत्ता कक्षाच्या वतीने मालवणी पोलीस स्टेशन येथे दिनांक ०५.०२.२०२१ रोजी गु. र. क्र. १०३/२०२१, कलम ३५४ (क), २९२, २९३, ४२०, २०१, ३४ भादंवि सह कलम ६६ (इ), ६७, ६७ (अ), माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारणा) २००८, सह कलम ३, ४, ६, ७ स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्यात अटक केलेल्या ५ आरोपींच्या चौकशीतून निष्पन्न झालेल्या अन्य ६ आरोपींना देखील अटक करण्यात आली. सदरील गुन्हा मालमत्ता कक्ष, गुन्हे अन्वेषण शाखा यांचेकडे वर्ग करण्यात आला असून गु. र. क्र. २६/२०२१ अन्वये नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच, मालवणी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. र. क्र. १२३/२०२१, गु. र. क्र. १०९७/२०२१, गु. र. क्र. ११२/२०२१, गु. र. क्र. ६४/२०२१ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून सदरील गुन्हे तपासाधीन आहेत. पिडीत महिलेने काम देण्याचे प्रलोभन दाखवून दमदाटी करून अश्लील, बिभत्स फिल्म चे चित्रिकरण करून सदर चित्रिकरण प्रसारित केल्याप्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाणे, जि. पालघर यांचेकडे दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने गु. र. .क्र. ००/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करून, सदर गुन्हा लोणावळा पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे. लोणावळा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ३८/२०२१ कलम ३७६, ३७७, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि सह कलम ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारणा) २००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपी हे मालवणी पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गु. र. क्र. २६/२०२१ मध्ये देखील आरोपी आहेत.

इंटरनेटचा गैरवापर करून युट्युबवर अश्लिल व्हिडिओ प्रसारित करणा-या ९ युट्युब चॅनेल विरूध्द पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. र. क्र. १६/२०२१ आणि इंन्स्टाग्राम या समाज माध्यमाच्या २२ टिपलाईन या खातेधारकांनी बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०४/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच, व्हाट्सअप या समाज माध्यमाचा वापर करून बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०१/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फेसबुक या समाज माध्यमाद्वारे बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पूर्व प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे

वि. स्था. गु. र. क्र. ०१/२०२१ आणि mx Takatak App द्वारे बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पूर्व प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०२/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

महिला व बालकांना सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्याकरिता मुंबई येथे न्यायसहाय्यक प्रयोगशाळा व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. याकरिता रु. ४.५८ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण केंद्राद्वारे पोलीस अधिकारी व कर्मचारी, सरकारी अभियोक्ता व न्यायविषयक अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सायबर गुन्हे रोखण्याकरिता शासन सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, शिक्षक, नागरिक यांच्याकरिता सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृतीचे कार्यक्रम/उपक्रम राबविण्यात येत आहेत. सदर जनजागृती कार्यक्रम/उपक्रमांमध्ये ६४,२३४ नागरिकांनी सहभाग घेतला आहे. सायबर सेफ वुमन, ॲन्टी फिशिंग पोर्टल, ब्लॅक फेस आपरेशन, इ. उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

३६.

२

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र.८१६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२१ चे तृतीय ( हिवाळी ) अधिवेशन.

श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ८१६ पुढीलप्रमाणे आहे.

"दि.१८.१२.२०२१ रोजीच्या सुमारास चेंबूर वाशीनाका येथे पावसासारख्या पांढ-या पावडरचा अचानकपणे वर्षाव होऊन तेथील रहिवाश्यांच्या घरात, जेवणात, वाहनांवर सर्वत्र पावडरचा थर साठणे, चेंबूरमध्ये हिंदुस्थान पेट्रोलियमचा तेल शुध्दीकरण प्रकल्प असून या प्रकल्पातून कॅटालिस्ट पावडरची गळती झाल्याने सदरच्या पावडरचा वर्षाव होणे दि. १८.१२.२०२१ रोजी दत्तजयंती असल्याने गव्हाण गावात सुरू असलेल्या भंडा-यात जेवण करीत असलेल्या भक्तांच्या जेवणात ही पावडर पडणे, परिणामी या भक्तांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, याबाबत हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीने या गळतीबदल माफी मागावी अशी मागणी स्थानिकांमधून करण्यात येणे, चेंबूरमध्ये अनेक केमिकल कंपन्या असून असे प्रकार वारंवार होत असल्याने स्थानिकांमध्ये सततच भितीचे व चिंतेचे वातावरण असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनची प्रतिक्रिया व भूमिका".

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांनी करावयाचे निवेदन.

मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.(रिफायनरी), माहुल, मुंबई येथे कार्यरत असुन खनिज तेलाचे शुध्दीकरण करुन लाईट डीस्टीलेटस् १९६८००० मे. टन/ वर्ष, मिडल डीस्टीलेटस् ३३१३००० मे. टन/ वर्ष, ल्युब ऑइल बेस स्टॉक-३३१००० मे. टन/ वर्ष, इतर हेवी प्रॅडक्ट २२८८००० मे. टन/ वर्ष व इलीमीनेटेड सल्फर-२६००० मे. टन/ वर्ष इत्यादी उत्पादन घेण्यासाठी या कारखान्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेतलेले असुन त्याची वैधता दि. ३१.०८.२०२५ पर्यंत आहे.

दि. १८ डिसेंबर, २०२१ रोजी पहाटे २ : ०० वाजता मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. रिफायनरीमधील न्यू फ्लुईडाइज्ड कॅटॅलिटिक क्रॅकिंग युनिट (NFCCU) मध्ये ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट गळतीची घटना घडली. न्यू फ्लुइडाइज्ड कॅटॅलिटिक क्रॅकिंग युनिट मधून ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट पावडरची गळती झाल्याचे लक्षात येताच, सुरक्षित कार्यप्रणालीनुसार उद्योगामार्फत न्यू फ्लुईडाइज्ड कॅटॅलिटिक क्रॅकिंग युनिट (NFCC) बंद करण्यात आले. दि. १८ डिसेंबर २०२१ रोजी रात्री १० : ०० वाजता कॅटकुलर मधील ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट काढण्याचे काम पुर्ण करण्यात आले. न्यू फ्लुइडाइज्ड कॅटॅलिटिक क्रॅकिंग युनिट (NFCCU) पासुन गव्हाणपाडा रहिवास परिसर दक्षिण-पश्चिम दिशेस अंदाजे ५०० मि. अंतरावर असुन तेथील पार्क केलेल्या वाहनांवर पावडर आढळुन आली.

सदर गळती झालेली ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट पावडर स्वरुपात असुन सेफ्टी डाटा शिट प्रमाणे पावडर घातक स्वरुपाची व हानिकारक नाही, तसेच सदर गळती झालेली ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट अंदाजे ५००-७०० किलोग्रॅम असल्याचे उद्योजकामार्फत सांगण्यात आले.

सदर परिसरातील हवेची गुणवत्ता दि. १९.१२.२०२१ ते २०.१२.२०२१ दरम्यान मोजमाप केले असता हवेतील धुळीच्या कणांची मात्रा ५४६ मायक्रो ग्रॅम प्रति घन मिटर एवढी आढळुन आली जी मानकांपेक्षा (१०० मायक्रो ग्रॅम प्रति घन मिटर) जास्त आहे. तसेच त्यामधील घटकांचे रासायनीक पृथकरण केले असता ॲल्युमिनाची मात्रा ५२.५ मायक्रो ग्रॅम प्रति घन मिटर, बेरीयम ची मात्रा ११.८८ मायक्रो ग्रॅम प्रति घन मिटर व मॅग्रेशियमची मात्रा १३.७८ मायक्रो ग्रॅम प्रति घन मिटर एवढी आढळुन आली. या पृथकरण अहवालानुसार असे दिसुन येते की, ॲल्युमिना सिलीकेट बेस कॅटॅलिस्ट इन ऑरगॅनिक स्वरुपातील असुन ते गळती झाल्यानंतर परिसरातील हवेत पसरल्याचे दिसुन येते.

उपरोक्त कारणामुळे सदर उद्योगास जल ( प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण ) कायदा, १९७४ चे कलम ३३ अ अन्वये व हवा ( प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण ) कायदा,१९८१ चे कलम ३१ अ अन्वये दि. २१.१२.२०२१ रोजी निर्देश देण्यात आले असुन त्यामध्ये औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय (DISH) यांचेकडून परवानगी मिळाल्याशिवाय न्यू फ्लुइडाइज्ड कॅटॅलिटिक क्रॅकिंग युनिट (NFCCU) चालु करण्यात येऊ नये, असे आदेश बजावण्यात आले आहेत.

त्यानुसार औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय यांचे मार्फत नवीन FCC युनिटची तपासणी करण्यात आल्यानंतर व समाधानकारक उपाययोजना केल्यानंतर सदर युनिट चालु करण्यात आले.

बृहन्मुंबई महापगरपालिकेने सदर घटनेमुळे या परिसरात कोणत्याही नागरीकास इजा व हानी झाली नसल्याचे कळविले आहे.

चेंबुर माहुल परिसरात मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. (रिफायनरी) व मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. (रिफायनरी), या खनिज तेलाचे शुध्दीकरण व त्यावर प्रकिया करणारे कारखाने, रासायनिक पदार्थाचे साठवणुक करणारे मे. एजीस लॉजीस्टीक लि. व मे. सिलॉड कंटेनर लि., मे. टाटा पॉवर कंपनी लि., औष्णिक विद्युत प्रकल्प व राष्ट्रीय केमीकल व फर्टीलायझ रासायनिक खते बनवणारा उद्योग असे मुख्य कारखाने कार्यरत आहेत. उपरोक्त सर्व उद्योगांनी संमतीपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे जल व हवा प्रदुषण नियंत्रण संयंत्रण बसविली असुन ती कार्यरत आहे. मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.(रिफायनरी) व मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.(रिफायनरी), मे. टाटा पॉवर कंपनी लि., व मे. राष्ट्रीय केमीकल व फर्टीलायझर लि. या उद्योगाने कारखाना परिसरात कंटीन्युअस हवा प्रदुषण मापन संयंत्रणा बसविली असुन ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या संगणक प्रणालीला जोडलेली आहेत. त्यामुळे त्या परिसरातील हवेच्या गुणवत्तेवर देखरेख करणे शक्य होते.

---